# शिवाजी विद्यापीठातील चौघे जागतिक शास्त्रज्ञ

## कॅलिफोर्नियातून घोषणा : पाटील, राजापुरे, जाधव, भालेकर यांचा समावेश


■ लोकमत न्यूज नेटवर्क



पी. एस. पाटील

**कोल्हापूर :** विविध क्षेत्रांतील जागतिक संशोधक, शास्त्रज्ञांच्या क्रमवारीत शिवाजी विद्यापीठातील चार प्राध्यापकांनी स्थान मिळविले आहे. त्यात प्रा. डॉ. पी. एस. पाटील, के. वाय. राजापुरे, ज्योती जाधव, सचिन भालेकर यांचा समावेश आहे.

कॅलिफोर्नियातील स्टँनफोर्ड विद्यापीठाने स्कोप्स या त्यांच्या जर्नलमध्ये जगातील विविध क्षेत्रांतील



के. वाय. राजापुरे



ज्योती जाधव



सचिन भालेकर



ए. व्ही. राव

प्राध्यापक, संशोधकांची क्रमवारी जाहीर केली आहे. त्यासाठी संबंधित प्राध्यापक, संशोधकाने सादर केलेले संशोधन पेपर, या पेपरचा संदर्भ म्हणून किती जणांनी वापर केला, आदी निकष होते.

या क्रमवारीतील अप्लाईड फिजीक्स संशोधनात शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. पाटील यांचा देशात पाचवा, तर जगात ३९१ वा क्रमांक आहे. त्यांचे ४५५ संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत.

मटेरियल सायन्समध्ये प्रा. राजापुरे यांचा ३२ वा क्रमांक असून त्यांचे संशोधन पेपर १८४ आहेत. या विभागातील माजी प्राध्यापक ए. व्ही. राव यांचा १३४ वा क्रमांक आहे

जैवतंत्रज्ञान आणि जीवरसायनशास्त्र, वैद्यकीय माहितीशास्त्राच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव आणि माजी विभागप्रमुख डॉ. संजय गोविंदवार यांनी पर्यावरणीय जैवतंत्रज्ञान, कंपवात आणि स्मृतिभ्रंश विभागात टॉप टू परसेंट शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळविले आहे.

त्यांचे आठ हजारांहून अधिक सायटेशनस आहेत. गणित अधिविभागातील सचिन भालेकर यांनी संख्यात्मक व संगणकीय गणित क्षेत्रात देशात सातवा, तर जगात २१८ वा क्रमांक मिळविला आहे.

संजय घोडावत विद्यापीठातील प्रा. सी. एच. भोसले यांनीही मटेरियल सायन्समध्ये स्थान मिळविले आहे

# स्टॅनफोर्डेच्या यादीत चंद्रकांत भोसले

**महुद : प्रतिनिधी**

अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने



सर्वेक्षण करून जगातील सर्वोच्च प्रशंसनीय संशोधकांची यादी बनवली आहे. या यादीत महुद (ता. सांगोला) येथील डॉ. चंद्रकांत हरी भोसले यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाने सर्वेक्षण करून जगातील दोन टक्के सर्वोच्च प्रशंसनीय संशोधकांची यादी नुकतीच जाहीर केली आहे. जगातील या दोन टक्के संशोधकांमध्ये येथील डॉ. चंद्रकांत हरी भोसले यांचा समावेश करण्यात आलेला आहे. घरची गरिबी असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या कमवा व शिका या योजनेतून काम करत डॉ. भोसले यांनी एम.एस्सी. ही पदवी घेतली. पुढे रयत शिक्षण संस्थेमध्ये प्राध्यापक म्हणून काम करीत असताना त्यांनी संशोधनही चालू ठेवले. सन १९८८ मध्ये त्यांनी पीएचडी मिळविल्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागात प्राध्यापक म्हणून काम केले.

शिवाजी विद्यापीठात पदार्थ विज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. 'पाणी शुद्धीकरण' हा त्यांच्या संशोधनाचा विषय असून, या विषयावर भारतासह परदेशात त्यांनी शंभरहून अधिक व्याख्याने दिली आहेत. २०१६ मध्ये शिवाजी विद्यापीठातून सेवानिवृत्त झाल्यानंतर ते अतिग्रे (जि. कोल्हापूर) येथील संजय घोडावत विद्यापीठात पदार्थविज्ञान विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

# 'तारा' रोबोट करणार आता निर्जंतुकीकरण

## कोरोनाशी लढायला 'यूव्ही-३६० सॅनिटायझर मॉड्यूल' सज्ज

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

'यूव्ही-३६० सॅनिटायझर मॉड्यूल' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रोबोटच्या (तारा) साहाय्याने आता कोरोना विषाणू व तत्सम सूक्ष्मजीवांचे निर्जंतुकीकरण करणे सहज साध्य होणार आहे. शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. आर.जी. सोनकवडे यांच्या नव्या संशोधनाने लक्ष वेधले आहे.

प्रा. सोनकवडे यांच्या मार्गदर्शनखाली बी.व्होक, दिनदयाल उपाध्याय कौशल्य केंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबादचे अनिकेत सोनकवडे, यूट्रॉनिक्स टेक्नॉलॉजी नागपूरचे रत्नदीप कांबळे, पवन खोब्रागडे, समीर रामटेके



व त्यांच्या टीमने ही संकल्पना सत्यात उतरवली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर रोबोटची निर्मिती महत्त्वपूर्ण ठरणार आहे. मानवी उपस्थितीत मानवी हालचाली अचूकपणे ओळखून तत्काळ अतिनील किरणांचे उत्सर्जन थांबवण्यासाठी यात 'पीआयआर' सेन्सर वापरला आहे. रूममध्ये फिरताना अडथळ्यांवर थडकून तो खराब होऊ नये, यासाठी 'अँटिकॉलीजन' सेन्सर वापरला आहे. निर्जंतुकीकरणाच्या ठिकाणाचे मोजमाप घेण्यासाठी 'लिडार' सेन्सर बसवला आहे. त्यामुळे रोबोटमध्ये असणाऱ्या ३६० अंश स्कॅनरच्या साहाय्याने द्विमिती, त्रिमितीमध्ये मोजमाप घेऊन त्यानुसार निर्जंतुकीकरणासाठी लागणारी वेळ स्वतः निश्चित करतो. २० किलो ग्रॅम वजन असणाऱ्या रोबोटची दहा बाय दहा मापाची खोली पाच मिनिटांपेक्षा कमी वेळेत निर्जंतुक करण्याची क्षमता आहे.

### आज ऑनलाईन उद्‌घाटन

रोबोट (तारा) उपकरणाचे गुरुवारी (दि. ५) दुपारी अडीच वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने उद्‌घाटन होणार आहे. ऊर्जामंत्री नितीन राऊत, उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी.शिर्के, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे मुख्य सचिव विजय सौरव, उद्योग मंत्रालयाचे आयुक्त डॉ. हर्षदीप कांबळे आदी उपस्थित राहणार आहेत.

यात वापरलेल्या ११ वॅटच्या १८ यूव्ही-सी ट्यूबमुळे कोरोना विषाणूसह इतर विषाणू व जीवाणूंचा नायनाट करणे शक्य होणार आहे. रोबोटमध्ये वापरलेल्या लिथियम आयन बॅटरीमुळे चार तास चार्ज केल्यानंतर रोबोट अडीच तास कार्यरत राहू शकतो. रोबोटसाठी बनवलेल्या खास अँड्रॉईड अ‍ॅपच्या मदतीने कुठूनही त्याला चालवणे शक्य आहे. मोबाईल वाय-फायद्वारे काही मीटर अंतरावरून हाताळला जाऊ शकतो. रोबोट इंटरनेट ऑफ थिंग्स तंत्रज्ञानाद्वारे परदेशातून चालवता येतो. रोबोटची कार्यस्थिती समजण्यासाठी त्यावर लेड बसवले आहेत. रोबोटच्या डोक्यावर बसवलेल्या कॅमेऱ्याच्या साहाय्याने त्या ठिकाणची सर्व दृश्ये पाहणे शक्य होणार आहे. रोबोटमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे सेन्सर्स आणि आर्टिफिशियल इंटिलिजन्स तंत्रज्ञान वापरले आहे. रोबोट आपल्यासोबत बोलू शकतो. कोरोना व इतर विषाणू, सूक्ष्मजीव, विकिरणे, विद्युत चुंबकीय लहरी, अतिनील किरणे अशा अनेक वैज्ञानिक बाबींवर माहिती देऊ शकतो. कोव्हिड -१९ वॉर्ड यासह विविध ठिकाणच्या निर्जंतुकीकरणासाठी हा रोबोट लाभदायक ठरणार आहे.

# सॅनिटायझर रोबोटचे आज अनावरण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी संशोधनातून 'युव्ही-३६० सॅनिटायझर मॉड्युल' हा रोबोट तयार केला आहे. त्याच्या माध्यमातून कोरोना विषाणू व तत्सम सूक्ष्मजीव असलेल्या जागांचे निर्जंतुकीकरण करणे सहज शक्य होणार आहे. या रोबोटचे ऑनलाईन अनावरण आज, गुरुवारी दुपारी अडीच वाजता तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे.

# बी. फार्मसीचा निकाल २४ तासात जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर



शिवाजी विद्यापीठातील पदवी अंतिम सत्राच्या ऑनलाईन परीक्षेपैकी बी. फार्मसी सेमिस्टर ८ चा निकाल २४ तासात जाहीर झाला आहे. या परीक्षेसाठी २२ महाविद्यालयातील १ हजार ३२८ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. तर ऑफलाईन परीक्षेतील १४ विषयांचे निकालही पूर्ण झाले आहेत.

गेल्या दहा दिवसापासून शिवाजी विद्यापीठातील पदवी अंतिम सत्राच्या ऑनलाईन आणि ऑफलाईन परीक्षा सुरू आहेत. सर्टीफिकेट कोर्स, इंडस्ट्रीयल, जॅपनीज लँग्वेज, क्लासिकल म्युझिक, ड्रमॅटिक, पोर्ट्रेट, भरत नाट्यम, कथ्थक, पर्यावरण संवर्धन आणि व्यवस्थापन यासह १४ विषयांचे ऑफलाईन परीक्षेचे निकाल जाहीर झाले आहेत.

**विद्यापीठ परीक्षा सुरळीत**

बुधवारी पहिल्या सत्रात बी. एस्सी., लॉ., एम. बी. ए., तर दुसऱ्या सत्रात एम. एस्सी., बी. बी. ए., बी. कॉम., एम. बी. ए., तसेच तिसऱ्या सत्रात बी. जे., एम. ए., बी. ए., बी. एस्सी., बी. ए. बी. एड., या परीक्षांचा समावेश आहे. बुधवारी एकूण ६० विषयांच्या परीक्षा पार पडल्या. तसेच विधी विभागाच्या सहा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षेसाठी अर्ज केला होता. परंतू या विद्यार्थ्यांचे नाव ऑनलाईनमध्ये नसल्याचे परीक्षेला आलेल्या विद्यार्थ्यांना समजताच त्यांनी परीक्षा विभागाशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांना परीक्षेतील त्रुटीची पुर्तता करीत अखेर त्या सहा विद्यार्थ्यांना लॉचा पेपर देण्यास परवानगी दिली.

बी फार्मसीचा निकाल जाहीर

# विद्यापीठाच्या ऑनलाईन परीक्षेचा पहिला निकाल

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने ऑनलाईन परीक्षेतील पहिला निकाल बुधवारी रात्री साडेआठच्या सुमारास जाहीर केला. बी. फार्मसीच्या आठव्या सत्रातील १३२८ विद्यार्थ्यांचा निकाल ऑनलाईन जाहीर झाला आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांमधील विविध २२ फार्मसी कॉलेजमधील १३२८ विद्यार्थ्यांनी अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यांची ऑनलाईन पद्धतीने दि. २७ ऑक्टोबरला परीक्षा सुरू झाली. ती सोमवारी (दि. २ नोव्हेंबर) संपली. त्यानंतर मूल्यमापन मंडळाकडून २४ तासांमध्ये निकाल जाहीर केला, अशी माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक पळसे यांनी दिली.



विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा दि. २७ ऑक्टोबरपासून सुरू झाल्या आहेत. एकूण १५५ परीक्षा होणार असून त्यासाठी ४८२५८ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन, तर २४४७५ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा देण्याचा पर्याय निवडला आहे.

# महावीर महाविद्यालयाला शैक्षणिक स्वायत्तता

## शिवाजी विद्यापीठाने महाविद्यालयाला पाठवले स्वायत्ततेचे पत्र

प्रतिनिधी
कोल्हापूर

महावीर महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून १० वर्षासाठी शैक्षणिक स्वायत्तता प्राप्त झाली आहे. यासंदर्भातील सूचना शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केल्या आहेत. पारंपारिक महाविद्यालयास स्वायत्ततेचा दर्जा मिळणारे हे दुसरे महाविद्यालय आहे. महावीर महाविद्यालयाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

महावीर महाविद्यालयाला स्वायत्तता प्राप्त झाल्याने अभ्यासक्रम तयार करणे, प्रवेश देणे, शुल्क आकारणे, परीक्षा घेणे, पदवी देणे हे सर्व अधिकार महाविद्यालयाला प्राप्त झाले आहेत. महाविद्यालयात कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम सुरू करता येणार आहेत. महाविद्यालयाची शिवाजी विद्यापीठाशी संलग्नता कायम राहणार असून, स्वायत्त महाविद्यालयाचा दर्जा प्राप्त झाल्यामुळे महाविद्यालय आंतरराष्ट्रीय पातळीवरही पोहचणार आहे. संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, चेअरमन के. ए. कापसे, सेक्रेटरी एम. बी. गरगटे, सर्व संचालक, प्राध्यापक, पालकांनी स्वायत्ततेबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

**कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करणार**

महावीर महाविद्यालयाला माझ्या कालावधीत ही स्वायत्तता मिळाली याचा मला आनंद आहे. जास्तीत जास्त कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम तयार करून विद्यार्थ्यांना रोजगार मिळवून देण्याच्या दृष्टीने नेहमीच प्रयत्न केला जाणार आहे.

**प्राचार्य डॉ. राजेंद्र लोखंडे (महावीर महाविद्यालय)**

# महावीर कॉलेजला शैक्षणिक स्वायत्तता

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील महावीर महाविद्यालयाला दहा वर्षांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) शैक्षणिक स्वायत्तता दिली आहे. स्वायत्तता मिळविणारे 'महावीर हे जिल्ह्यातील दुसरे महाविद्यालय ठरले आहे. त्याबाबतची माहिती शिवाजी विद्यापीठाने बुधवारी संकेतस्थळावर जाहीर केली आहे.

महावीर महाविद्यालयाला नॅकचे 'अ' मूल्यांकन आहे. असे मूल्यांकन करणाऱ्या महाविद्यालयांनी शैक्षणिक स्वायत्तेसाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन युजीसीने केले होते. त्यानुसार या महाविद्यालयाने मार्च २०१९ मध्ये युजीसीला प्रस्ताव सादर केला. त्यानंतर डिसेंबरमध्ये युजीसीच्या समितीने पाहणी करून जुलैमध्ये स्वायत्ततेचा प्रस्ताव मंजूर केला. त्याची माहिती शिवाजी विद्यापीठालाही कळविली. त्यानंतर विद्यापीठाने त्यांच्या पातळीवरील प्रक्रिया पूर्ण करून या स्वायत्ततेबाबतचे पत्र बुधवारी महाविद्यालयाला पाठविले आणि संकेतस्थळावर त्याबाबची माहिती प्रसिद्ध केली. स्वाययत्ता मिळाली असली, तरी विद्यापीठासमवेत महाविद्यालयाची संलग्नता कायम राहणार आहे, अशी माहिती या महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र लोखंडे यांनी दिली.